जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY

Address- Office of Dy.Commissioner of Police, Zone-1, Thane,
Jail Road Thane, Near Old R.T.O.Office, Opp. Central Ground, Thane (w) Maharashtra 400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

प्रेसनोट / /२०२६ दिनांक – १३/०२/२०२६

कळवा पोलीस स्टेशनची उल्लेखनिय कामगिरी

''CEIR पोर्टल व तांत्रिक माहितीच्या आधारे कळवा पोलीस ठाण्यातील प्रॉपर्टी मिसींग मधील मोबाईल चा शोध घेण्यास कळवा पोलीसांना यश''

कळवा पोलीस ठाणे परिसरात सन २०२५/२०२६ या वर्षात विविध कंपनीचे मोबाईल फोन हरविलेले असुन, त्याबाबत कळवा पोलीस स्टेशन येथे प्रॉपर्टी मिसींग नोंदी करण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रॉपर्टी मिसींगचे अनुषंगाने श्री. अशोक उतेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अनिल गायकवाड पो.निरी. गुन्हे, श्री. विठठल नावडे पो.निरी. प्रशासन, श्री सुनिल पुंगळे, पो.निरी. कायदा व सुव्यवस्था यांनी गुन्हे प्रकटीकरणाचे स्टाफ यांना सदर प्रॉपर्टी मिसींगची प्रकरणे उघडकीत आणणेबाबत मार्गदर्शन करून सुचना दिलेल्या होत्या.

त्या अनुषंगाने दाखल प्रॉपर्टी मिसींग मधील मोबाईल फोनबाबतची सविस्तर माहिती **CEIR** या पोर्टलमध्ये भरून, त्यानुसार प्राप्त माहिती विविध तांत्रिक पध्दतीने, बारकाईने विश्लेषण करून त्याआधारे हरविलेल्या मोबाईल फोनचे वापरकर्त्यांचे पत्त्यासंदर्भात माहिती प्राप्त करून अत्यंत कौशल्यपुर्ण तपास करून पत्त्यावर समक्ष जावुन, संबंधीत विविध मोबाईल धारकांकडुन एकुण ८३ विविध कंपन्यांचे मोबाईल फोनचा शोध घेवुन कळवा पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेवुन वरिलप्रमाणे प्रॉपर्टी मिसींग मधील १२,४७,००० रू. किमतीचे मोबाईल फोन हस्तगत करून ते मुळ मालकांना मिळवुन दिले अशी उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ ठाणे श्री. सुभाषचंद्र बुरसे, सपोआ कळवा विभाग प्रिया डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे करण्यात आलेली आहे.

कळवा पोलीस स्टेशनचे श्री. अशोक उतेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अनिल गायकवाड पो.निरी. गुन्हे, श्री. विठठल नावडे पो.निरी. प्रशासन, श्री सुनिल पुंगळे, पो.निरी. कायदा व सुव्यवस्था यांनी पो.हवा./३४१८ वैभव जोशी, पो.हवा./६६५८ शरद हंडाळ, पो.शि./१८५४ सुरेश रेपाळे, पो. शि./२४०१ महादेव हजारे यांना दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे **CEIR** पोर्टल च्या मदतीने व विविध तांत्रिक पध्दतीने व बारकाईने विश्लेषण करून सदरची उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

//——//——//